रयत शिक्षण संस्था, सातारा.

इयत्ता ५ वी | द्वितीय सत्र परीक्षा २०२४ - २५ | गुण - ४०

वेळ २.०० तास | विषय - परिसर अभ्यास | पेजेस - २

सूचना: १) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. २) उजवीकडील अंक गुण दर्शवतात.

## परिसर अभ्यास भाग - १

१. अ) कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. ३

१) वाऱ्याच्या वेगाचा वापर करुन चालवल्या जाणाऱ्या शिडाच्या जहाजाला ....... म्हणतात. (नौका, पाणबुडी, गलबत)

२) सोलापूर जिल्ह्यातील नान्नज येथे .......... पक्ष्यांचे अभयारण्य आहे. (बदक, मोर, माळढोक)

३) गोड लागणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये विविध प्रकारच्या .......... असतात. (चवी, ऊर्जा, शर्करा)

ब) योग्य जोड्या जुळवा. २

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) हृदय | अ) पचनसंस्था |
| २) जठर | ब) चेतासंस्था |
| | क) रक्ताभिसरण संस्था |

क) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) ३

१) आपल्या भावना कोणकोणत्या आहेत नावे लिहा.

२) सर्व मुलामुलींचे वाढीचे वय किती वर्षे असते ?

३) लसीकरण म्हणजे काय ?

४) 'पदार्थ सूक्ष्म कणांचा बनलेला असतो,' हा सिद्धांत कोणी मांडला ?

५) संदेशवहन म्हणजे काय ?

२. अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (फक्त २) ४

१) पावसाचे पाणी कशासाठी अडवावे लागते ?

२) मुंबई हे कापड उद्योगाचे मोठे केंद्र का बनले ?

३) अनुवंशिकता म्हणजे काय स्पष्ट करा.

ब) प्रत्येकी दोन नावे लिहा. २

१) पिष्टमय पदार्थ - १) .............. २) ...............

२) जंगलात राहणारे प्राणी - १) .............. २) ...............

क) कंसातील योग्य पर्याय निवडा. ४

(शरणवने, पाणी, मोराची चिंचोली, सौरऊर्जा)

१) मोरांसाठी प्रसिद्ध गाव - ..........

२) न संपणारा ऊर्जास्त्रोत - ..........

३) मध्यप्रदेशात आढळणाऱ्या देवराया - ..........

४) स्थायू, द्रव व वायू या तिन्ही अवस्थांमध्ये आढळणारा पदार्थ - .........

३. अ) कारणे लिहा. (कोणतेही १) २

१) भरभर जेवताना जोराचा ठसका लागतो.

२) अन्न नेहमी झाकून ठेवणे महत्वाचे असते.

ब) खालीलपैकी कोणताही एक उपप्रश्न सोडवा. ४

१) सामाजिक आरोग्य धोक्यात आणणारे घटक कोणते ते लिहा.

२) कंसातील माहितीवरुन खालील चौकटी पूर्ण करा.

(चादर, हिमरुशाल, हातमाग व यंत्रमागावरील कापड, पैठणी)

१) औरंगाबाद (संभाजीनगर) - ☐

२) सोलापूर - ☐

३) इचलकरंजी - ☐

४) पैठण - ☐

## परिसर अभ्यास भाग - २

४. अ) कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. २

१) माणसाने सर्वात प्रथम वापरात आणलेला धातू ............ हा होय. (लोखंड, सोने, तांबे)

२) इजिप्तच्या राजांना ............ म्हणतात. (इंद्र, राजपुत्र, फॅरो)

ब) १) खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा. १

१) मध्यप्रदेशात - भीमबेटका

२) महाराष्ट्र - विजापूर

२) खालीलपैकी कोणत्या आधुनिक यंत्रामध्ये दगडाचा वापर केला जातो ?

अ) मिक्सर ब) पिठाची चक्की क) मसाला कांडप

क) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) २

१) नवाश्मयुगीन संस्कृतीचे वैशिष्ट्ये कोणते ?

२) पशुपालन म्हणजे काय ?

३) चाकाचा शोध सर्वप्रथम कोणत्या युगात लागला ?

५. अ) थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन ) ४

१) हंगामी तळातील व्यक्ती कोणते व्यवसाय करीत असाव्यत ?

२) अश्मयुग म्हणजे काय ? अश्मयुगाचे कालखंड कोणते ?

३) हडप्पा संस्कृतीच्या नगरांची रचना कोणत्या प्रकारची होती ?

ब) कारणे लिहा. (कोणताही १) २


१) नाईल नदीकाठची जमीन अत्यंत सुपीक झाली.

२) मानव एके ठिकाणी दीर्घकाळ मुक्काम करु लागला.

क) कोणताही एक उपप्रश्न सोडवा. ४

१) कंसातील माहितीच्या आधारे संकल्पना चित्र पूर्ण करा.

(चीन संस्कृती, हडप्पा संस्कृती, इजिप्त, मेसोपोटेमिया)




२) टीपा लिहा. : - नागरी समाजव्यवस्था.